अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. १५ मे २०२५ | वर्ष १० वे | अंक ४० वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

# सीबीएसई १० वी बोर्ड परिक्षेत एलएमबी स्कुलची अदिती ठाकूर तालुक्यात प्रथम

## नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल केंद्रिय मंडळाने मंगळवारला ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावर जाहीर केला. परीक्षा १५ फेब्रुवारी ते ४ एप्रिल २०२५ या काळात झाली. निकाल १३ मे २०२५ रोजी जाहीर झाला. यात पूर्व विदर्भात शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रम्हपुरी शहरातील नेवजाबाई भैया शिक्षण संस्थेतंर्गत येणाऱ्या एल.एम.बी. पब्लिक स्कूलची विद्यार्थीनी आदिती ठाकूर हिने ९६.६० टक्के गुण संपादित करीत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच आर्या पोफले ह्या विद्यार्थीनीने ९६ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय तर अन्वीता लभाने ह्या विद्यार्थीनीने ९५.८० टक्के गुण प्राप्त करून तृतीय स्थान मिळविले. तसेच एल.एम.बी.पब्लिक स्कूलचा सार्थक शेंडे व ब्रम्हपुरी पब्लिक स्कूल, ब्रम्हपुरीची विद्यार्थीनी स्पर्शीका खोब्रागडे यांनी ९३ टक्के गुण प्राप्त करीत चतुर्थ स्थानी येण्याचा मान पटकाविला. तर एल.एम.बी.पब्लिक स्कूलचे विद्यार्थी आस्था मेश्राम, अक्षरा शेंडे, ओजस घोनमोडे यांनी प्रत्येकी ९२.२० टक्के गुण संपादित करून तालुक्यातून पाचवे स्थान गाठले.


कु. अदिती ठाकूर
(९६.६० टक्के)

एल.एम.बी.पब्लिक स्कूलची विद्यार्थीनी आदिती ठाकूर हिच्या या कामगीरीमुळे ब्रम्हपुरी तालुक्याच्या व नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम गुण प्राप्तीमुळे नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेचे साचिव अशोक भैय्या, एल.एम.बी.पब्लिक स्कूलच्या संचालिका आशिता भैया, प्राचार्य कादिर कुरेशी यांनी अभिनंदन केले.

**वाचाल तर वाचाल..**

# एसएससी परिक्षेत ख्रिस्तानंद स्कूलची अदिती वालदे तालुक्यात अव्वल

## ब्रम्हपुरी तालुक्याचा निकाल ८७.३७ टक्के

ब्रम्हपुरी/महेश पिलारे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल राज्यमंडळाने मंगळवारला दुपारी ०१ वाजता ऑनलाईन पद्धतीने संकेतस्थळावर जाहीर केला. यात ब्रम्हपुरी तालुक्यातून ख्रिस्तानंद स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ब्रम्हपुरी येथील विद्यार्थीनी आदिती क्रिष्णा वालदे हिने ९६ टक्के गुण संपादित करून तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच सार्थक विवेक खडतकर, आर्यन अशोक नवघडे, हेमांशी राजेश दोनाडकर ह्या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९५ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय तर नामश्री रविंद्र ठाकूर व डॉ.आंबेडकर विद्यालय ब्रम्हपुरी येथील विद्यार्थी निलेश मिलींद बोरकर यांनी अनुक्रमे ९४.८० टक्के गुण प्राप्त करून तृतीय स्थान मिळविले. ख्रिस्तानंद स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ब्रम्हपुराचा विद्यार्थी शौर्य विलास बागडे ९४.४० टक्के गुण प्राप्त करीत तालुक्यातून चतुर्थ व


कु. अदिती वालदे
(९६.०० टक्के)

नेवजाबाई हितकारिणी विद्यालय ब्रम्हपुरीचा विद्यार्थी हर्षल होमराज पगाडे याने ९४.२० टक्के गुण संपादित करीत पाचवे स्थान प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या सर्वोत्तम गुण प्राप्तीमुळे नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैय्या, प्राचार्य डॉ. देवेश कांबळे, मुख्याध्यापिका सिस्टर पावना, मुख्याध्यापिका प्रभा बनपूरकर, मुख्याध्यापक कपूर नाईक यांनी अभिनंदन केले.

ब्रम्हपुरी तालुक्यातील २४०० विद्यार्थ्यांपैकी २३८४ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली होती. परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांपैकी २०८३ विद्यार्थी इयत्ता १० वी ची परीक्षा उत्तीर्ण झाले असून यात प्राविण्य श्रेणीमध्ये ३२८ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये ५९७ तर द्वितीय श्रेणीमध्ये ७९२ व पास श्रेणीमध्ये ३६६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ब्रम्हपुरी तालुक्याचा इयत्ता १० वी चा निकाल ८७.३७ टक्के इतका लागला आहे. ब्रम्हपुरी तालुक्यातून ख्रिस्तानंद ज्यु. कॉलेज ब्रम्हपुरी, वैनगंगा विद्यालय कोलारी, श्री कॉन्हेंट, मदर पेट स्कूल ॲण्ड किड्स प्ले होमचा निकाल १०० टक्के लागला आहे.

**ब्रम्हपुरी तालुक्यातील विद्यालय निहाय निकाल पुढीलप्रमाणे** - ने.हि. विद्यालय ब्रम्हपुरी -८८.२९ टक्के, लोकमान्य टिळक विद्यालय, ब्रम्हपुरी -९०.६२ टक्के, विकास विद्यालय अऱ्हेर नवरगांव ९३.२२टक्के, ने.हि.कन्या विद्यालय ब्रम्हपुरी ९४.७८ टक्के, सिद्धार्थ विद्यालय नान्होरी ८२.२२टक्के, लोक विद्यालय गांगलवाडी ८४.४४टक्के, महाराष्ट्र विद्यालय पिंपळगांव भो. ८५.१८टक्के, डॉ. आंबेडकर विद्यालय ब्रम्हपुरी ८७.५०टक्के, महात्मा फुले विद्यालय मेंडकी ८७.८३टक्के, कर्मवीर विद्यालय मुडझा ७५.७५टक्के, कृषक विद्यालय चौगान ७५.२९टक्के, जिल्हा परिषद हायस्कूल ब्रम्हपुरी ५७.१४टक्के, कर्मवीर कन्नमवार विद्यालय सुरबोडी ८७.२३ टक्के,

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# उद्देश पूर्ण झाले का ?

'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत दहशतवाद्यांच्या नऊ ठिकाणांवर अचानक हल्ला करून भारतीय लष्कराने पाकिस्तानला जोरदार धडा शिकवला. पण, एवढे करूनही खरोखरच पाकडे सुधारतील की नाही हे काळच सांगेल. पण शनिवारी संध्याकाळी अमेरिकेच्या मध्यस्थीने जाहीर झालेल्या शस्त्रसंधीने पाकिस्तानचेच जास्त नुकसान केले, असे स्पष्ट दिसत आहे.

चार दिवस चाललेल्या या लढाईत पहिल्यापासून भारत एवढा वरचढ राहिला की हे सारे प्रकरण एकतर्फी होत चालले होते. पाकिस्तानच्या ५-६ मुख्य विमानतळावर जोरदार गोळीबारी करून भारताने एकप्रकारे त्याला भयंकर जायबंदी केले होते. पाकिस्तानचे अंतर्गत वातावरण तापलेले असल्याने त्याच्यापुढे इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिती झाली. याचा अर्थ भारताने सगळेच बरोबर केले काय ? याबाबत देखील उलटसुलट चर्चा होऊ शकते. देशाला एवढ्या युद्धाच्या खाईत लोटून सरकारने काय कमावले. पाकिस्तानकडून सुरु असलेला दहशतवाद पूर्ण बंद झाला काय? होणार काय? ज्या पद्धतीने हे सारे अचानक थांबवले गेले, त्याचा अर्थ 'चुन, चुन के मारेंगे'चे काय झाले? देशाच्या सीमावर्ती इलाक्यात जम्मू पठाणकोट, पूंछ वगैरे भागात पाकिस्तानच्या कारवाईने बरेच नुकसान झाले.

भारताच्या कारवाईने पहिल्या दोन-तीन दिवसात अमाप मार खाल्लेले पाकिस्तानी लष्कर आता काहीतरी वेडे कृत्य करेल की काय याच्याच उलटसुलट चर्चा सुरु झाली होती त्यामुळे शस्त्रसंधी झाली ते बरे झाले. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प हे त्यांचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांना कामाला लावून भारत आणि पाकिस्तानला शांत करण्याचे प्रयत्न करतील असे राजकीय वर्तुळात बोलले जात होते. ते खरे ठरले. अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स यांनी भारत-पाकमध्ये सुरु झालेल्या चकमकीत अमेरिकेला नाक खुपसण्याचे काम नाही, असे म्हटले, पण राजकीय वर्तुळात त्याचा अर्थ वेगळा काढला गेला. पाकिस्तानला भारत चांगला धडा शिकवत असताना आम्हाला त्यात मध्ये पडावयाचे नाही, असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ जाणकार काढत होते.

कारगिल युद्धाच्या वेळी देखील अमेरिकेने मध्यस्थी केलेली होती. पण, तत्कालीन राष्ट्राध्यक्षांनी त्याबाबत जाहिरातबाजी टाळली होती. भारताला जेवढे अडचणीत टाकले जाईल, तेवढा आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपला फायदा राहील, असे पाकिस्तानचा सर्वात जवळचा मित्र चीनला वाटत होते. म्हणून तो पाकिस्तानचा वापर करू शकतो, याची अमेरिकेला जाणीव आहे. अमेरिका असो की चीन, पाकिस्तान हा आंतरराष्ट्रीय राजनीतीमध्ये वापराचीच वस्तू राहिला. त्यातून त्याने आणि त्याच्या लष्कराने खूप कमावले आणि खूप गमावलेदेखील. त्यामुळे पाकिस्तानची औकात काय ती साऱ्या जगाला माहित आहे. पाकिस्तानमधील वाढता दहशतवाद हा त्याने भारताला डसवण्यासाठी दहशतवादाचा साप पाळला, त्यामुळे निर्माण झालेला आहे.

येत्या काळात भारताची कारवाई कशा प्रकारची राहणार? हे चीन पाकिस्तानच्या मदतीला कशाप्रकारे धावणार यावर अवलंबून होते. २०२० साली लडाखच्या गलवान खोऱ्यात झालेल्या धुमश्चक्रीनंतर भारत आणि चीन सीमेवर शांतता असली तरी तणाव कायम आहे. स्थानिक पातळीवर तसेच उच्च लष्करी स्तरावर चिक्कार बैठका घेऊन देखील चीन तसूभर देखील मागे सरलेला नाही. त्याने आपली ४५०० चौरस किलोमीटर जमीन बळकावलेली आहे. राजकीय पातळीवर देखील बोलणी होऊन देखील फारशी परिस्थिती सुधारलेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

• ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिद्धीसाठी संपर्क करा •
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

# धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस केव्हा?

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र शासनाने दि. २५ मार्च २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करून धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टर २० हजार रुपयाचे बोनस जाहीर केला. मात्र जवळपास दिड महिन्याचा कालावधी लोटूनही अद्यापपर्यंत शासनाकडून कोणत्याही हालचाली दिसून येत नसल्याने शासनाप्रति शेतकऱ्यांमध्ये रोष व्यक्त करण्यात येत आहे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे येथील मुख्य व्यवसाय शेती आहे. मात्र शासनाचे शेतकऱ्यांप्रति असलेले विरोधाभासी धोरण हे शेतकऱ्यांना मारक ठरत आहे. शेती व्यवसायाला लागणाऱ्या सर्व साहित्याचे दर गगनाला भिडलेले आहेत. कधी निसर्ग साथ देत नाही. अशा परिस्थितीत वाढलेले उत्पादन खर्च, धानाला मिळणारा कमी भाव, यामुळे धानाची शेती करणे दिवसेंदिवस तोट्याचा सौदा होत चाललेला आहे.

अशा या धान उत्पादक शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत म्हणून शासनाने प्रति हेक्टर २० हजार रुपये बोनस देण्याचे विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीर केले होते. मार्च महिन्याच्या पहिले हे बोनस मिळेल, अशी शेतकऱ्यांना आशा होती. मात्र शासनाने शासन निर्णयच २५ मार्चला काढला. त्यानंतर लवकरच बोनस मिळेल, अशी अपेक्षा असताना आता दिड महिन्याचा कालावधी लोटूनही अद्याप शेतकऱ्याच्या खात्यात बोनस जमा झाला नाही. शेतकरी बोनस अनुदानाची प्रतीक्षा करीत असून बँकेत जावून चौकशी करून चपला झिजवीत असल्याचे दिसून येत आहे. शासन बोनसची रक्कम कधी शेतकऱ्याच्या खात्यात वळती करणार, याकडे शेतकऱ्यांच्या नजरा लागलेल्या आहेत.

**जल है तो कल है...**

# न.प.ची मान्सूनपूर्व तयारी नियोजनशून्य

## मान्सूनपूर्व तयारीसाठी मनोज भुपाल यांच्या नेतृत्वात न.प.ला निवेदन

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहरातील चौरीकर ले आउटमधिल प्रभाग क्र. ९ मधील पटेल नगर येथे २० यांच्या रिकाम्या प्लाट पासून ते ब्रह्मपुरी-आरमोरी मुख्य रस्ताला जोडलेला नालीपर्यंत तसेच प्रविण कराडे यांचे घराच्या कॉनरपासुन



ते २५ वर्षापासून रहिवाशी असलेल्या नागरिकांच्या घरासमोरील नाल्या जिर्ण अवस्थेत असून नगर परिषदने त्या नाल्याचे बांधकाम न केल्यामुळे घाण पाणी नागरिकांच्या घरात जात आहे. आता पावसाळ्याला सुरुवात होणार तर ते येणारे घाण पाणी नागरिकांच्या घरात जाणार व आरोग्यावर परिणाम होणार आहे. नगरपरिषद ब्रह्मपुरीची मान्सून पुर्व तयारी अजिबात दिसून येत नाही.

न. प. कारभारामुळे आम जनता त्रस्त आहे. चौरीकर ले-आउट मधिल सध्या स्थितीत कमकुवत व जिर्ण झालेल्या नाल्यांच्या जागी नविन नालीचे बांधकाम करण्यात यावे व नाल्यांची तात्काळ साफसफाई करण्यात यावी. यामध्ये वैद्य-सोरते-श्रीमती बगमारे-दर्वे-जितेंद्र शेंडे-यांच्या जे. के. मॉल चे मागील बाजू तसेच सुरेश दर्वे तर जनबंधु यांच्या घरासमोरील नालीची साफसफाई व ब्रह्मपुरी-आरमोरी हायवेवरील मुख्य नालीची तात्काळ आणि अति शिघ्र साफसफाई करून पाण्याचा निचरा करण्यात यावा याबाबत चे निवेदन न. प. मुख्याधिकारी यांना दिले आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मुख्य नालीचे तात्काळ अपुर्ण असलेले काम त्वरित ठेकेदाराकडून पावसाळ्याअगोदर पुर्ण करण्यात यावे, मुख्य नालीचे ठेकेदाराकडून साफसफाई करून घेण्यात यावे, ब्रह्मपुरी-आरमोरी रोड लगत रुख्मिणी सभागृह समोरील दोन्ही नाल्यातील सांडपाणी निघण्याची तात्काळ व्यवस्था करण्यात यावी याबाबतचे निवेदन नागरिकांच्या स्वाक्षरी सहित सादर करण्यात आले आहे. तरी वरील मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन कामाला त्वरित सुरुवात करण्यात यावी. अन्यथा ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून सदर काम दुसऱ्या ठेकेदाराकडून मान्सून सुरू होण्यापूर्वी करण्यात यावे. मागण्या मान्य न झाल्यास रुख्मिणी सभागृह समोर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा निवेदनकर्त्यांनी दिला आहे.

निवेदन देतेवेळी मनोज भुपाल, प्रविण कराडे, अनिल बगमारे, मोरेश्वर दर्वे, किशोर भोयर, नामदेव भोयर, प्रा.डॉ. अशोक सालोटकर, प्रभाकर धकाते, दाजीबा सोनकुसरे, शिवानंद गादेवार, फारुख अन्सारी, मनोज मासुरकर, विनोद चिंचेकर, अहमद पठाण, रमेश राउत, बंडु पाठक आदि उपस्थित होते.

## विनोदिनी

एक बुजर्ग ने सुनने की नई मशीन लगवाई।
नई मशीन बहुत छोटी थी और आसानी से दिखती नहीं थी। एक हफ्ते बाद वह फिर डॉक्टर के पास पहुंचा।
डॉक्टर : कैसी चल रही है नई मशीन?
बुजुर्ग : बढ़िया।
अब मैं अपने रिश्तेदारों की सारी बातें अच्छे से सुन सकता हूं।
डॉक्टर : तब तो आपके रिश्तेदार बहुत खुश होंगे।
बुजुर्ग : नहीं, मैंने उन्हें बताया नहीं है। मैं पहले की तरह बैठा रहता हूं और वे लोग मुझे बहरा समझकर बात करते रहते हैं।

# सी.बी.एस.ई. परिक्षेतील प्राविण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थी

## एल.एम.बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी

### इयत्ता १० वी



| अदिती ठाकूर | आर्या पोफले | अन्विता लभाने | सार्थक शेन्डे | आस्था मेश्राम |
|---|---|---|---|---|
| 96.60% | 96.00% | 95.80% | 93.00% | 92.20% |

### इयत्ता १२ वी



| सोहन पिसे | रूपक चहांदे | स्वरा कावळे |
|---|---|---|
| 91.00% | 88.00% | 85.20% |

# एस.एस.सी. परिक्षेतील प्राविण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थी

## नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय, ब्रम्हपुरी




| विद्या पडोळे | भार्गवी हटवार | दिव्यानी ठेंगरे | गाथा फुलझेले | माही पेलणे | श्रेया पिलारे | अदिती गुरपुडे |
|---|---|---|---|---|---|---|
| 93.60% | 90.40% | 90.20% | 90.00% | 90.00% | 68.00% मराठी माध्यम | 65.40% मराठी माध्यम |

## ख्रिस्तानंद विद्यालय ब्रम्हपुरी



| अदिती वालदे | सार्थक खडतकर | आर्यन नवघडे | हेमाक्षी डोनाडकर | नम्रश्री ठाकूर | शौर्य बागडे |
|---|---|---|---|---|---|
| 96.00% | 95.00% | 95.00% | 95.00% | 94.80% | 94.40% |

## ने.हि. विद्यालय, नवेगांव पांडव




| वैष्णवी गजपुरे | अमन किनेकार | गौरी भोयर |
|---|---|---|
| 94.20% | 92.20% | 89.40% |

## नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, ब्रम्हपुरी



| हर्षल पगाडे | साहिल राऊत | हर्षल विखार | कृणाल सुर्यवंशी | अमन नागोसे | प्रेम ठिकरे |
|---|---|---|---|---|---|
| 94.20% | 90.00% | 90.00% | 89.80% | 89.60% | 86.40% |

## डॉ. आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी



| निलेश बोरकर | करण ठवरे | ओनिका चिलबुले | अविनाश धानफोले | आयुष सांगोळकर |
|---|---|---|---|---|
| 94.80% | 93.00% | 89.40% | 89.00% | 89.00% |

## लोकमान्य टिळक विद्यालय, ब्रम्हपुरी



| रिध्दी भागडकर | प्रगती ठाकूर | मयुरी बगमारे | भावना पुरी | प्रतिक रामटेके | जान्हवी ढोरे |
|---|---|---|---|---|---|
| 90.80% | 89.40% | 84.80% | 83.40% | 82.60% | 82.40% |

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे ब्रम्हपुरी समाचार परिवारतर्फे हार्दिक अभिनंदन! हार्दिक अभिनंदन!

# ने.हि. महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ थाटात संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरातील नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी द्वारा संचालित नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी २०२५ च्या बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. या विद्यार्थ्यांच्या कठोर मेहनतीचा गौरव वाढविण्यासाठी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या यशाची पुढीलप्रमाणे नोंद झाली.

ने ही महाविद्यालयाचा



एकूण निकाल ९७ टक्के लागला. विज्ञान शाखेतिल कु. मानसी सुभाष ठाकरे हिला ८७ टक्के, कु. सानिका प्रकाश बोरकर हिला ८६ टक्के आणि धनंजय देवकुमार चनफने याला ८३.३३ टक्के गुण प्राप्त झाले. वाणिज्य शाखेतील कु. सिद्धि अशोक पटेल हिला ९७.१७ टक्के, कु. स्मिता लोमेश तोंडरे हिला ९२.६७ टक्के तर ओम प्रशांत बल्लेवार याला ९०.१७ टक्के गुण प्राप्त झाले. त्याचप्रमाणे कु. मेघा लोखंडे हिला ८१.१७ टक्के आणि कु. दिपाली म्हसके हिला ७७.१७ टक्के गुण प्राप्त झाले. कला शाखेतील कु. वैष्णवी रोहिदास मोहुर्ले ८५.३३ टक्के, सम्यक नरेश पाटिल याला ८२.६७ टक्के तर कु. वसुंधरा अनंता झोडे हिला ८२.३३ टक्के गुण प्राप्त झाले. एमसीव्हीसी विभागात कु. प्रतिक्षा सुरेश राऊत हिला ७६.३३ टक्के, कु. अंकिता अरुण बगमारे हिला ७३.६७ टक्के आणि कु. शिवानी यादवराव मसराम हिला ७२.३३ टक्के गुण प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्यकारी प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर होते. संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांची प्रमुख उपस्थिती होती. कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, प्रा. विनोद नरड, गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक वर्ग तसेच महाविद्यालयातील समस्त प्राध्यापकवृंद यावेळी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्रमुख पाहुण्यांनी सांगितले की, 'ने ही संस्थेचा समर्पित भाव, विद्यार्थ्यांची चिकाटी, पालकांचे पाठबळ आणि शिक्षकांचे मार्गदर्शन हेच या यशाचे खरे गमक आहे.'

कार्यक्रमाचे संचालन प्रा. सुरेखा बगमारे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. आनंद भोयर, तर आभारप्रदर्शन प्रा. कोमलकांत ठोंबरे यांनी केले. महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेला साजेसे असे हे यंदाचे घवघवीत यश संपूर्ण ब्रम्हपुरीसाठी गौरवाची बाब ठरली आहे.

**वाचाल तर वाचाल**

# भू-वैकुंठ अड्याळ टेकडी येथे 'जीवन शिक्षण शिबीर'



ब्रम्हपुरी/का.प्र.

कर्मयोगी संत पूज्य तुकारामदादा गीताचार्य यांनी गाव स्वावलंबी व स्वयंशासित होण्यासाठी १९७४ मध्ये भू-वैकुंठ आत्मानुसंधान, अडयाळ/टेकडी(ब्रम्हपुरी) येथे उन्हाळी जीवन शिक्षण शिबीराची निर्मिती केली होती. तेव्हापासून तर आजपर्यंत तिच परंपरा कायम ठेवून यावर्षी सुद्धा ५ मे ते २० मे पर्यंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जीवन शिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

सदर शिबिरात सामुदायिक ध्यान- प्रार्थना, भजन -भाषण, ग्रामोद्योग, राष्ट्रीय बौद्धिक, योगा-प्राणायाम, लाटीकाटी, दांडपट्टा, कराटे, ढाल- तलवार , आदर्श दिनचर्या, योग निसर्गोपचार, पंचगव्य चिकित्सा इत्यादी शिक्षण दिल्या जात आहे. दिनांक ५ मे रोज सायंकाळी सामुदायिक प्रार्थनेने शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

सदर शिबिरात विद्यार्थी प्रशिक्षक व व्यवस्थापक मिळून चंद्रपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, नागपूर जिल्ह्यातून २५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. सन-२०२५ मध्ये जीवन शिक्षण अध्यात्म गुरुकुल, भू-वैकुंठ अड्याळ टेकडीच्या माध्यमातून अशाच प्रकारचे शिबिर आंबोली/चौरस्ता (चिमूर), उर्जानगर (चंद्रपूर), सोंद्री(ब्रह्मपुरी), जामदरी टेकडी (नांदेड/मराठवाडा), सौंसर (मध्य प्रदेश) इत्यादी ठिकाणी आयोजित करण्यात येत आहे. सदर शिबिराचे संचालन व मार्गदर्शन सुबोधदादा, नवलाजी मुळे, सुश्री. रेखाताई, सुश्री. गंगाताई करीत आहे. तसेच अक्षय कुळे गुरुजी, पराग खोकले, मधुकर टिकले, विशाल पोहनकर, जोशेष वाढई, यश उरकुडे, ओम निनावे, रोहित मैंद, शितल भाजीपाले, आरती दोनाडकर, रत्ना दोनाडकर, तेजस्विनी भाजीपाले, निधी उरकुडे, संचिता बोरकुटे, वैदेही दडमल प्रशिक्षक म्हणून अव्याहत सेवा देत आहेत. व्यवस्थापक म्हणून सुश्री. लक्ष्मीताई सोबत सुभाषभाऊ बोरकर, गणेश रोडे, विलास गजभे, लोकेश मुळे, श्रवण मोहोळ, विशाखा काजरखने, माधुरी चौधरी, मनोरमा मैंद, वत्सला बुटके, मीरा मुळे सेवा रुजू करीत आहेत. २० मे रोज सायंकाळी ५ वाजता शिबिराचा समारोप सांगता कार्यक्रम संपन्न होणार असल्याची माहिती आहे.

❀❀❀❀❀❀❀

# वांद्रा फाट्याजवळील अपघातात १ ठार, दोघे गंभीर जखमी

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील वांद्रा फाट्याजवळ चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने



गाडी रस्त्यालगत असलेल्या झाडावर आदळली. यात चालकाचा जागीच मृत्यू झाला असून, दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना सोमवारी (दि.१२) दुपारच्या सुमारास घडली.

येशुदास चंदनबावणे (१८ रा. ब्रह्मपुरी) असे मृत चालकाचे नाव आहे. तर छगन भास्कर शेंडे (३५, रा. गेवरा) आणि निकेश दशरथ प्रधान (२०, रा. बरडकिन्ही,) अशी जखमींची नाव आहे. येशुदास चंदनबावणे हा किराणा माल पुरवठ्यासाठी एमएच-३४-बीझेड-७३५२ क्रमांकाच्या वाहनाने बाहेरगावी जात होता. त्याच्यासोबत छगन भास्कर शेंडे आणि निकेश दशरथ प्रधान हे दोन सहकारीही होते. येशुदासने भरधाव वेगात व निष्काळजीपणे गाडी चालवत असताना वांद्रा गावाच्या फाट्याजवळ त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यामुळे गाडी थेट रस्त्यालगत उभ्या असलेल्या झाडावर जाऊन आदळली.

अपघात इतका भीषण होता की, येशूदास याचा जागीच मृत्यू झाला. इतर दोघांना गंभीर दुखापत झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच ब्रह्मपुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय, ब्रम्हपुरी येथे पाठविण्यात आले. वृत्त लिहेपर्यंत या प्रकरणाची नोंद ब्रह्मपुरी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# घरी कुणीही नसल्याचा फायदा घेत चोरीचा प्रयत्न

ब्रह्मपुरी/का.प्र.

घरी कुणी नसल्याचा फायदा घेत चोरांनी रात्री घरात प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न केला. ही घटना सोमवारी (दि.१२) सकाळी उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार भागवत यांचे कुटुंब रविवारी (दि.११) सकाळी ९.३० वाजता गावाला गेले होते. रात्री ९ वाजता चंद्रपूरवरून परतले. सोमवारी सकाळी भागवत यांच्या पत्नीला किरायदार मुलीच्या गेटचा हॅन्डल तोडलेला व सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे वायर तोडले असल्याचे दिसताच घरी चोरीचा प्रयत्न झाल्याचे त्यांना कळले. दरम्यान या घटनेची माहिती भागवत यांनी ब्रह्मपुरी पोलिस स्टेशनला दिली व घटनेविरूद्ध रिपोर्ट दाखल करण्यात आला. पोलिसांनी वेळीच दखल घेत घर गाठून सीसीटीव्ही फूटेज चेक करून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# समाज व शिक्षकांशी ऋणानुबंध जपणे ही मोठी उपलब्धी - अशोक भैया



ब्रम्हपुरी/का.प्र.

'आपल्या आयुष्यात शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन जीवनापर्यंत अनेक शिक्षक व समाजशील व्यक्ती येतात. त्यातील मोजकेच आयुष्याला दिशा देणारे ठरतात. तसेच शिक्षकांच्या जीवनातही असंख्य विद्यार्थी येतात, पण ऋणानुबंध जपणारे विद्यार्थी फार थोडेच मिळतात, असे विद्यार्थी म्हणजे समाज व शिक्षकांसाठी मोठी उपलब्धी असते, प्राचार्य डॉ. गहाणे हे उत्कृष्ट शिक्षक, विद्यार्थी व उत्तम प्रशासक ठरले,' असे विचार अशोक भैया यांनी व्यक्त केले. ते प्राचार्य डॉ. धनंजय गहाणे यांनी सेवापूर्ती निमित्त आयोजित केलेल्या 'ऋणानुबंध' सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्नेहलताताई भैया, उपाध्यक्ष प्रकाशजी भैया, ॲड. भास्करराव उराडे, मोहनलाल भैया, राकेशजी कऱ्हाडे, सुभाषजी बजाज, प्रा. जी.एन. केला, डॉ. संजीव मोहरील, हुकुमचंदजी कशीवार व डॉ. एन.एस. कोकोडे मान्यवर इत्यादी उपस्थित होते. ऋणानुबंध सोहळ्यात अनेक मान्यवर शिक्षक, प्राध्यापक, सहकारी व पदाधिकारी यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गहाणे कुटुंबियांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी मनोगते व्यक्त करून डॉ. गहाणे यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे संचालन केतन गहाणे व वेदिका गहाणे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. तनुजा गहाणे तर आभार डॉ. धनंजय गहाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंजली गहाणे, डॉ. मोहन कापगते, डॉ. सुभाष शेकोकर, प्रा. प्रफुल्ल पराते, डॉ. किशोर नाकतोडे, प्रा. रुपेश वाकोडीकर, प्रा. सुशील बोरकर, नंदुभाऊ खुणे, रूपराम गहाणे, खेमराज डोंगरवार, फाल्गुन गहाणे, देवयानी गहाणे इत्यादींनी परिश्रम घेतले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# वडसा मॅरेथॉनमध्ये पीआरडी स्पोर्ट्सचे विद्यार्थी चमकले



ब्रम्हपुरी/का.प्र.

मागील ८ वर्षापासून अनेक विद्यार्थ्यांना मानसिक व शारीरिक प्रशिक्षण देऊन विविध स्पर्धांच्या माध्यमातून ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारात ब्रह्मपुरी शहराचे नाव लौकिक करणाऱ्या पी.आर.डी. स्पोर्ट्स ,ब्रह्मपुरी च्या विद्यार्थ्यांनी दिनांक १२ मे २०२५ सोमवार ला सकाळी ८:०० वाजता बुद्ध पौर्णिमेनिमित्त जुनी वडसा येथे संबोधी बुद्ध विहार व विजय गेम क्लब ,वडसा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत उत्कृष्ट प्रदर्शन दाखवित ४ गोल्ड २ सिल्वर तर १ ब्राँझ मेडल मिळविला.

यामध्ये १० वर्षातील मुलांच्या १ किमी. दौड स्पर्धेत कु. अर्पित हिवराज सोमनकार याने प्रथम क्रमांक तर कु. वेद प्रदीप ठेंगरी याने दुतिय क्रमांक तर कु.निर्मित राहुल भोयर याने तृतिय क्रमांक पटकाविला तर १० वर्षातील मुलींच्या १ किमी. दौड स्पर्धेत कुमारी. आरुषी होमराज फटिंग हीने प्रथम क्रमांक पटकावला तर १४ वर्षातील मुलींच्या २ किमी. दौड स्पर्धेत कुमारी मानसी शेखर फटिंग प्रथम कुमारी श्वेता विष्णू पिल्लारे द्वितीय क्रमांक पटकाविला तसेच १६ वर्षातील मुलींच्या ३ किमी. दौड स्पर्धेत कुमारी समीक्षा हीरालाल राऊत हिने प्रथम क्रमांक पटकावला विद्यार्थ्यांनी आपल्या विजयाची श्रेय पालक व पी.आर.डी. स्पोर्ट्स, ब्रम्हपुरीचे संचालक राहुल जुआरे सर यांना दिले.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३९००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३१५

**... QUOTES ...**

"The Buddha did not claim any divinity for himself or for his Dhamma. It was discovered by man for man. It was not a revelation." - Dr. B.R. Ambedkar

**चारोळी**

काहूर ठेवशील डोक्यात तर
खाल्लं अन्न अंगाला लागत नाही...
ऊतू गेलेलं दूध पिऊन,
शेगडी धष्टपुष्ट कधी होत नाही...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# वैनगंगा विद्यालय कोलारीचा १०० टक्के निकाल




ब्रम्हपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यापासून १५५ कि मी अंतरावर दूर ब्रम्हपुरी तालुक्याचा टोकावर, वैनगंगा नदीच्या तीरावर असणारी हि शाळा वैनगंगा विद्यालय कोलारी जे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य १९९१ पासून करीत आहे. या वर्षीच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत महात्मा फुले शिक्षण संस्था द्वारा संचालित वैनगंगा विद्यालय कोलारी शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, तालुक्यातून एकमेव खाजगी माध्यमाची शाळा असण्याचा मान या शाळेने पटकाविला आहे.

सदर शाळेतून वैभव राजेश्वर बरडे हा विद्यार्थी ७७.४० टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे तर कु. विदिशा कवळू वासनिक ७६.८० घेऊन द्वितीय तर कु. खुशबू रामदास तुपट ७४.४०३ गुण घेऊन तृतीय आली आहे व स्नेहा चंद्रशेखर अंबोने ७३.८० टक्के गुण घेऊन चतुर्थ स्थानी आली आहे.

'विद्यार्थ्यांचे हे यश म्हणजे त्यांच्या मेहनतीसह शिक्षकांच्या समर्पित मार्गदर्शनाचे आणि पालकांच्या पाठबळाचे फलित आहे. आम्ही यापुढेही शैक्षणिक क्षेत्रात नवनवीन उंची गाठण्यासाठी कटिबद्ध आहोत,' असे संस्था अध्यक्ष प्रा. डॉ देविदास जगनाडे तथा संस्था सचिव प्रा. दिलीप जगनाडे यांनी सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. धनंजय दाते, वरिष्ठ शिक्षक नागपुरे सर, प्रधान मॅडम ,कोल्हे मॅडम, लिपिक अवसरे ,प्र. परिचर देशमुख ,परिचर रामटेके यांनीही विद्यार्थ्यांना भविष्यातील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात बुध्द जयंती

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, ब्रह्मपुरी येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त अभिवादन तथा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्थेचे सचिव तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स ब्रम्हपुरीचे प्राचार्य डॉ. देवेश कांबळे यांनी आपल्या मार्गदर्शनात तथागत भगवान बुद्धांचा संदेश कालसापेक्ष असून येणाऱ्या सर्व काळासाठी आणि समाजासाठी प्रासंगिक आणि प्रेरणादायी राहील कारण बुद्धाचा धम्म हा मानवी कल्याणाचा विवेकनिष्ठ विज्ञानवादी विचार आहे असे प्रतिपादन केले.

प्रा. माला खोब्रागडे यांनी मार्गदर्शन केले. प्रसंगी प्रा. रंगारी सर यांनी सामुहिक बुद्धवंदना घेतली. कार्यक्रमाचे संचालन तथा आभार प्रदर्शन प्रा. तुफान अवताडे यांनी केले.प्रसंगी शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांचे सीबीएसई १२ वी परिक्षेत घवघवीत यश


सोहन पिसे
९१.०० टक्के


रूपक चहांदे
८८ टक्के


कु. स्वरा कावळे
८५.२० टक्के

ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी बारावी सीबीएसई बोर्ड परीक्षेत पहिल्याच वर्षी २०२४-२०२५ सत्रात घवघवीत यश संपादन केले आहे. एन. एच. एज्युकेशन सोसायटी गेल्या अनेक वर्षापासून आपल्या विविध शाखेतून शिक्षणाचा दर्जा अधिकाधिक उंचावित आहे. याच सोसायटी अंतर्गत येणाऱ्या एल. एम. बी. पब्लिक स्कुलने यशाची परंपरा कायम राखलेली आहे.

यावर्षी २०२४ २०२५ या शैक्षणिक सत्रातील बारावीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम टक्केवारीत बाजी मारून निकालात भर पाडलेली आहे. यामध्ये सोहन पंढरी पिसे या विद्यार्थ्यांने ९१ टक्के गुण प्राप्त करून स्कुलमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. रूपक राजेश्वर चहांदे याने ८८ टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक तर कु. स्वरा श्रीकांत कावळे हिने ८५.२० टक्के गुण प्राप्त करून तिसरा क्रमांकावर झेप घेतली आहे. वर्ग १२ वीच्या विद्यार्थ्यांनी ही प्रथम बॅच असून त्यांनी उत्तम निकाल देऊन शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवलेला आहे.

यावर्षीच्या सीबीएसई १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी निकालात केलेल्या उत्तम शैक्षणिक कामगिरीबद्दल आणि त्यांनी प्राप्त केलेल्या घवघवीत यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य वगादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## एसएससी परिक्षेत ख्रिस्तानंद स्कुलची...

(पान क्र. ९ वरून)

महाराष्ट्र विद्यालय आवळगांव ८५.४८टक्के, ख्रिस्तानंद स्कूल ब्रम्हपुरी १००टक्के, सावित्रीबाई फुले विद्यालय ब्रम्हपुरी ८१.४८ टक्के, ज्ञानोपासक विद्यालय निलज ८०.५०टक्के, वैनगंगा विद्यालय कोलारी १००टक्के, निरूपा विद्यालय रूई ९४.२३टक्के, ज्ञानगंगा स्कूल बेटाळा ८८.०५टक्के, नितीन हायस्कूल अड्याळ जाणी ७६.४७टक्के, मिलींद विद्यालय भूज ८० टक्के, ज्ञानगंगा विद्यालय हळदा ९४.२८ टक्के, माध्यमिक आश्रम शाळा ब्रम्हपुरी ९२.०३टक्के, महात्मा फुले विद्यालय किन्ही ८४ टक्के, सावित्रीबाई फुले विद्यालय मेंडकी ७३.३३ टक्के, छत्रपती शाहू महाराज विद्यालय वायगाव ५१.६१ टक्के, अरून विद्यालय रानबोथली ६७.७४टक्के, आतिश केंद्रिय माध्यमिक निवासी आश्रमशाळा गांगलवाडी ७५ टक्के, डॉ.श्यामाप्रसाद निवासी आश्रमशाळा उदापूर २५ टक्के, अनु.आदिवासी माध्यमिक आश्रमशाळा एकारा ७२.२२ टक्के, हिंदू ज्ञान मंदिर ब्रम्हपुरी ९६.२९ टक्के, श्री.कॉन्हेंट १००टक्के, मदर पेट स्कूल १०० टक्के असा एकुण निकाल ८७.३७ टक्के इतका तालुका निहाय निकाल लागला आहे.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


## गायत्री परिवार ब्रम्हपुरीद्वारे १६०० घरी गायत्री यज्ञ संपन्न



ब्रम्हपुरी/का.प्र.

अखिल विश्व गायत्री परिवार ब्रह्मपुरीच्या वतीने बुध्द पौर्णिमेच्या शुभ पर्वावर गृहे - गृहे गायत्री यज्ञ अभियानांतर्गत १६०० घरांमध्ये गायत्री यज्ञाचे आयोजन करण्यात आले. अखिल विश्व गायत्री परिवार शांतीकुंज हरिद्वार यांच्या मार्गदर्शनात विश्वाच्या कल्याणासाठी संपूर्ण देशात एकाच दिवशी आणि एकाच वेळेस बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी गायत्री यज्ञाचे आयोजन करण्यात येते.

ब्रह्मपुरी तालुक्यातील प्रत्येक कार्यकर्त्यांने विविध गावातील नवीन कुटुंबांची भेट घेऊन त्यांना आजच्या परिस्थितीत यज्ञाचे भौतिक आणि मानसशास्त्रीय महत्त्व पटवून दिले. सोप्या पद्धतीने यज्ञ करता यावा यासाठी सर्व कुटुंबांना सूक्ष्म यज्ञ किटचे मोफत वाटप करण्यात आले. वैदिक काळापासून चालत आलेला यज्ञ, पर्यावरण आणि मन शुद्ध करण्यासाठी वापरला जात असे. आजही वातावरण बराच प्रदूषित झालेला असून अनेक प्रकारचे जिवाणू, विषाणू आणि बुरशी विविध रोग पसरवण्यास मदत करत आहेत. या समस्येवर यज्ञ हा एकमेव उपाय आहे. या संदर्भात देश-विदेशातील विविध शास्त्रज्ञांकडून संशोधन कार्य सुरू आहे.अखिल विश्व गायत्री परिवार यज्ञाच्या माध्यमातून विविध रोगांवर विशेष औषधी वनस्पतींद्वारे उपचार करत आहे. आज आपण इलेक्ट्रॉनिक उपकरणांमधून निघणाऱ्या हानिकारक किरणांच्या संपर्कात आहोत. मोबाईल आणि टीव्ही यांसारख्या उपकरणांमधून उत्सर्जित होणाऱ्या रेडिएशनचा आपल्या आरोग्यावर घातक परिणाम होत आहे. यज्ञ ही भारतीय ऋषीमुनींनी आपल्याला हानिकारक किरणांपासून संरक्षण करण्यासाठी, घरात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्यासाठी आणि आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य संतुलित ठेवण्यासाठी दिलेली एक अमूल्य देणगी आहे.

सर्वांनी सूक्ष्म यज्ञ पूर्ण भक्तिभावाने केला. यज्ञ करणाऱ्या कुटुंबियांनी सांगितले की, यज्ञ जरी लहान असला तरी त्यातून मिळालेल्या ऊर्जेने आम्हाला खूप आनंद झाला. गायत्री परिवाराने दिलेल्या या सुवर्णसंधीबद्दल सर्वांनी गायत्री परिवार ब्रम्हपुरी यांचे आभार मानले. सर्वांनी सहकार्य केल्याबद्दल गायत्री परिवारानेही सर्वांचे मनापासून आभार मानले आहे.


प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स

गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी

रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.


(पान क्र. ९ वरून)


घर विकणे आहे.
ब्रम्हपुरी शहरातील स्टेशन रोडवरील पेठवार्ड, बुरड मोहल्ला येथील दुमजली १२०० चौ.फुट बांधकाम असलेले घर विकणे आहे.
संपर्क : 9822912701, 9421815111

- ब्रम्हपुरी समाचारमध्ये जाहिरात प्रसिध्दीसाठी संपर्क करा -
महेश पिलारे मो. 9503100964
प्रा. विजय मुडे सर मो. 8275715315

Lubi PUMPS•MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404